# प्रसनोट

## २६ जानेवारी गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला.

जा.क्र. ६८ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२७/१/२०१७

भंडारा :— येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर दि. २६/०१/२०१७ रोजी २६ जानेवारी गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी .तसेच मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनिता साहु तसेच मा.जे.एस.भोर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधीकारी भंडारा , मा. अप्पर पोलीस अधिक्षक रश्मी नांदेडकर तसेच सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकारी , विदयार्थी ,पालक नागरीक व पत्रकार हजर होते.कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने करण्यात आली व ध्वजारोहण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस दल, भंडारा गृहरक्षक दल, एनसी. पथक, दामीणी पथक,पोलीस श्वान पथक मिळुन अशा २३ पथंकाचा समावेश होता. यावेळी परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. साळी दुय्यम परेड कमांडर सपोनी रहांगडाले सायबर सेल हे होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी आपल्या भाषणात उपस्थीत असलेल्या सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सुरवीरांनी आपल्या प्राणाची बाजी लावुन देशाच्या स्वातंत्र्यासाठी दाखवीलेल्या अलौकीक कामगीरीमुळे आपन गणतंत्र दिवस साजरा करतो ,सैनिक व पोलीस यांच्या सतर्कतेमुळे आपन सुरक्षीत जिवन जगतो, याची जाणीव आपण सर्वांनी ठेवली पाहीजे अशा प्रकारे गणतंत्र दिवसा बाबत माहीती दिली.

यावेळी सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये रॉयल पब्लीक स्कुल भंडारा येथील विदयार्थ्यांचे देशभक्ती गित ,नुतन कन्या शाळा येथिल विदयार्थ्यांचे पंजाबी नृत्य, लेझीम चे कार्यक्रम सादर करण्यात आले भंडारा जिल्हा पोलीस बॅड पथकाने उत्कृष्ट वादयवृंद सादर केले, तसेच राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धा यांना प्रथम व द्वतीय पुरस्कार देण्यात आले. तसेच सैनिक शाळा लाखनी व नुतन कन्या शाळा भंडारा याना उत्कृष्ट परेड केल्याबाबत पुरस्कार देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी, मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु,, मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मी नांदेडकर ,जिल्हा माहीती अधिकारी भंडारा,उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. जोगदंळ भंडारा, राखीव पोलीस निरीक्षक (पो. मु.) श्री. लोळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पो.स्टे.चे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपतस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व मुंकुद ठवकर यांनी केले.

(बी. आर. गाडे)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता